आनंदाचा झरा — प्रा. डॉ. नंदा हरम

हल्लीच औंधमध्ये असलेल्या आमच्या वाचक गटाचा 'असिस्टेड लिव्हिंग' असलेल्या एका संस्थेत साहित्यिक कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात ग्रंथपरिचय, कथाकथन, कविता सादरीकरण, अनुभव कथन अशा गोष्टींचा समावेश होता. तसं पाहिलं तर त्या संस्थेतील सर्व सभासद कमीत कमी सत्तरीच्या पुढचे असतील, त्यातून ते काही ना काही व्याधीग्रस्त! पण शांत चित्ताने त्यांनी कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. त्यांच्या चेहऱ्यावरच्या हावभावांवरून कार्यक्रम आवडल्याचं स्पष्ट जाणवत होतं. तसे त्यांनी सांगितलंही. एक काकू म्हणाल्या, "तुमचा शब्द न् शब्द कानात साठवून ठेवत होते." दुसऱ्या एक तर ९२ वर्षांच्या होत्या. एकूणच ही वयोवृद्ध माणसं आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर उभी असताना अजूनही त्यांचं मन कलासक्त आहे. प्रत्येक गोष्टीतून आनंद भरभरून घेत आहेत.

दुसरी एक घटना. एप्रिल महिन्यात मी अशाच तऱ्हेच्या दुसऱ्या एका संस्थेत माझ्या नातेवाईकांना भेटायला गेले होते. बरोबर आंबे नेले होते. शेजारच्या बेडवर नव्वदी पार केलेले काका होते. स्वच्छ गोरे, कृश आणि छोटीशी चण. वजन असेल जेमतेम ३५-३६ किलो. त्यांना आंबा दिल्यावर त्यांचा चेहरा खुलला, खाऊ मिळाल्यावर आनंदित होणाऱ्या एखाद्या बालकासारखा! डोळेही लकाकले. म्हणाले, "सिझनचा पहिला आंबा!" केवढं अप्रूप वाटलं त्यांना! आंबा कापून दिल्यावर आम्हांलाही फोड दिली आणि मग मन लावून आंबा खाल्ला. नंतरच्या भेटीच्या वेळी ते आजारी पडले होते. आठ-एक दिवसांत ते निवर्तले. अत्यंत दुःख झालं, पण एक समाधान होतं की त्यांनी आवडीने सिझनचा पहिला आंबा खाल्ला.

दोन्ही घटनेत एक विलक्षण साम्य, ते म्हणजे हे वयोवृद्ध जिवंत असलेला आनंद, त्यांच्यातला जिवंतपणा! आयुष्याच्या या टप्प्यावर कशी साधली ही किमया? हा आनंदाचा झरा आणला कुठून? तो जिवंत ठेवला कसा! कठीण प्रसंग, दुःखाचे क्षण, आप्तस्वकीयांचा वियोग अशा जीवनात आलेल्या दगड-धोंड्यांनी झऱ्याचा प्रवाह थांबविला नाही. किती आश्चर्य वाटतं! मनोमन हीच प्रार्थना, त्यांचा झरा अखंड वाहो आणि आम्हांलाही असाच झरा प्राप्त होवो...

— प्रा. डॉ. नंदा हरम (९३७०२९०३०६)